# लेखी परीक्षेसाठी मार्गदर्शक सूचना (इ.१२वी)

१. एप्रिल-मे २०२१ मध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) ची लेखी परीक्षा दि.२३/०४/२०२१ ते दि.२१/०५/२०२१ या कालावधीत प्रचलित पध्द्तीने (ऑफलाईन) आयोजित करण्यात आलेली आहे.

२. लेखी परीक्षा विद्यार्थ्यांच्या कनिष्ठ महाविद्यालयातच घेण्यात येईल. अपवादात्मक परिस्थितीत एकापेक्षा अधिक कनिष्ठ महाविद्यालये एकत्र करून परीक्षा घेण्यात येईल. अशा प्रकरणी प्राचार्यांनि आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची बैठक व्यवस्था त्यांना परीक्षेपूर्वी माहित करुन दयावी. कोणताही विद्यार्थी या कारणास्तव परीक्षेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

३. एखादा विद्यार्थी आरोग्यविषयक कारणामुळे परीक्षेस गैरहजर राहिल्यास अशा विद्यार्थ्यांची विशेष परीक्षा (ऑफलाईन) जून महिन्यामध्ये आयोजित करण्यात येईल. विशेष परीक्षा ही मूळ परीक्षेचाच भाग राहील.

४. विशेष परीक्षा मंडळामार्फत जुलै-ऑगस्ट मध्ये घेण्यात येणाऱ्या पुरवणी परीक्षेसाठी निश्चित केलेल्या परीक्षा केंद्रावर घेण्यात येईल. सदर परीक्षा केंद्रे ही शहरी भागात ठराविक ठिकाणी व ग्रामीण भागात प्रामुख्याने तालुक्याच्या मुख्यालयात निश्चित करण्यात आलेली आहेत. त्यामुळे या विशेष परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना मंडळाने निर्धारित केलेल्या या परीक्षा केंद्रावर जाऊनच परीक्षा दयावी लागेल.

५. शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये कोविड-१९ विषाणूचा प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष उपस्थितीसह शाळा उशीराने सुरू झालेल्या आहे. तदूनंतर काही ठिकाणी त्या वेळोवेळी बंद ठेवाव्या लागल्या. त्यामुळे विद्यार्थ्यांचा लेखनाचा सराव पुरेसा होऊ न शकल्यामूळे लेखी परीक्षेतील पेपरचा वेळ या परीक्षेला ७० ते १०० गुणांच्या पेपरसाठी ३० मिनिटे व ४० ते ६० गुणांच्या पेपरसाठी १५ मिनिटे वाढविण्यात येत असून त्यानुसार सुधारित अंतिम वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे.

६. या जादा वेळेव्यतिरिक्त दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी असलेल्या जादा वेळेसह इतर सर्व सुविधा व सवलती कायम राहतील.
(उदा. तीन तासाच्या पेपरसाठी या परीक्षेला ३ तास ३० मिनीटे देण्यात आलेली आहे. या वेळव्यतिरिक्त दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी सदर तीन तासाच्या पेपरसाठी ६० मिनीटे प्रचलित जादा वेळेची सवलत देय राहील.)

७. विशेष परीक्षा ही मूळ परीक्षेचाच भाग राहील. विशेष परीक्षेसाठी वेगळे शुल्क आकारले जाणार नाही. तसेच सदर परीक्षेचे वेळापत्रक मंडळामार्फत अलहिदा जाहीर करण्यात येईल आणि परीक्षेच्या वेळापत्रकात दोन विषयांमध्ये सार्वजनिक सुट्टी वगळता खंड ठेवण्यात येणार नाही.

८. अ. लेखी परीक्षेमध्ये **प्रथमच प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांना २५ टक्के कपात केलेल्या अभ्यासक्रमानुसार परीक्षा दयावी लागणार आहे.** उदा. नियमित (Regular) विद्यार्थी, तुरळक (Isolated) विषय घेऊन प्रविष्ठ होणारे विद्यार्थी, प्रथमच प्रविष्ठ होणारे खाजगी विद्यार्थी, आय.टी.आय. चे (औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे) Transfer of Credit साठी काही विषयांना प्रविष्ठ होणारे विद्यार्थी.

ब. **लेखी परीक्षेस प्रविष्ठ होणारे पुनर्परीक्षार्थी,** (Repeater) **श्रेणीसुधार** (Class Improvement Scheme) **म्हणून प्रविष्ठ होणारे विद्यार्थी यांना १०० टक्के अभ्यासक्रमानुसार परीक्षा दयावी लागेल.**

९. परीक्षा केंद्रावर येणाऱ्या सर्व घटकांनी कोविड-१९ विषाणू प्रादुर्भावाच्या अनुषंगाने शासनाच्या व आरोग्य विभागाच्या सर्व सूचनांचे पालन करणे बंधनकारक असेल.

१०. इ.१२ वी परीक्षा सकाळ सत्रात १०.३० वाजता व दुपार सत्रात ३.०० वाजता आयोजित करण्यात आलेली आहे. त्यामुळे परीक्षार्थ्यांनी Thermal Screening साठी परीक्षेच्या प्रत्यक्ष वेळेपूर्वी किमान एक ते दीड तास अगोदर परीक्षा केंद्रावर उपस्थित राहाण्याबाबत विद्यार्थ्यांना सूचित करावे. परीक्षा केंद्राच्या मुख्यप्रवेशद्वारावर विद्यार्थ्यांना प्रवेश देताना प्रथम परीक्षार्थ्यांसह परीक्षेशी संबंधित सर्व घटकांचे Thermal Screening द्वारे तापमान मोजण्यात येईल.

११. विद्यार्थ्यांचे तापमान तपासल्यानंतर प्रत्यक्ष पेपरच्या वेळेपूर्वी किमान ३० मिनिटे अगोदर म्हणजेच सकाळ सत्रात १०.०० वाजता आपल्या निर्धारित परीक्षा कक्षामध्ये बैठक व्यवस्थेच्या ठिकाणी स्थानापन्न होईल असे पहावे. प्रत्यक्ष लेखी परीक्षा सुरु होण्यापूर्वी १० मिनिटे अगोदर प्रश्नपत्रिका वाचण्यासाठी देण्यात येईल.

१२. परीक्षा केंद्रामध्ये पिण्याच्या पाण्याची व सॅनिटायझारची व्यवस्था करण्यात आलेली आहे. तथापि, अधिक सुरक्षिततेच्या दृष्टीने विद्यार्थ्यांनी परीक्षा केंद्रात परीक्षेसाठी येताना स्वतःची पाण्याची बाटली व सॅनिटायझर छोटी बाटली सोबत ठेवावी. तसेच स्वतःचा मास्क व लेखन साहित्य (उदा-पेन, पेन्सिल, कंपास इ.) सुध्दा स्वतःसोबत आणणे आवश्यक राहील. परीक्षार्थी/विद्यार्थ्यांने एकमेकांचे पेन, पेन्सिल, कंपास वापरु नये याबाबतच्या सूचना विद्यार्थ्यांना देण्यात याव्यात.

१३. एखादा विद्यार्थी कोविड-१९ विषाणूने बाधित झालेला असल्यास अशा विद्यार्थ्याची माहिती केंद्रसंचालकांना अगोदर देण्यात यावी. तसेच सदर विद्यार्थ्यांची विशेष परीक्षा घेतली जाईल त्यासाठी तो प्रविष्ट होऊ शकतो यासंबंधी पालकांना कल्पना दयावी. त्यामुळे असे विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही.

१४. परीक्षेदरम्यान एखादया परीक्षार्थ्यास कोरोना प्रादुर्भावाच्या अनुषंगाने त्रास झाल्यास व त्याची परीक्षा देण्याची इच्छा असल्यास परीक्षार्थ्याच्या संमतीने त्याची परीक्षा केंद्रात स्वंतत्र कक्षात बैठक व्यवस्था करण्यात येईल.

१५. कोविड-१९ चा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता खबरदारी म्हणून परीक्षा केंद्राजवळील सरकारी आरोग्य केंद्रामार्फत आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत संबंधित विभागाला विनंती करण्यात येईल.

१६. परीक्षेदरम्यान दोन विद्यार्थ्यांमध्ये पुरेसे अंतर ठेवून बैठक व्यवस्था करण्यात येईल. शारिरीक अंतर राखले जाईल याची दक्षता घेण्याबाबत विद्यार्थी व पालक यांना सूचित करावे.

१७. प्रत्येक पेपरच्या वेळी परीक्षा केंद्र/उपकेंद्रात प्रवेश करतांना व पेपर संपल्यावर बाहेर जातांना विद्यार्थ्यांनी गर्दी टाळण्याच्या दृष्टीने आरोग्यविषयक सर्व सूचनांचे पालन करण्याबाबत विद्यार्थ्यांना सूचना दयाव्यात.

१८. कोविड -१९ विषाणूच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांचा परीक्षेचा ताण-तणाव कमी करण्याच्या अनुषंगाने विद्यार्थी/पालक यांना वारंवार येणाऱ्या शंकाची (FAQ) उत्तरे राज्यमंडळाच्या संकेतस्थळावर प्रश्नोत्तरांच्या स्वरुपात उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे याबाबतची माहिती विद्यार्थी व पालक यांच्या निदर्शनास आणून दयावी.

उपरोक्त सर्व सूचना शाळेच्या दर्शनी भागातील नोटीस बोर्डवर, शाळेच्या संकेतस्थळावर तसेच शाळेने तयार केलेल्या विद्यार्थी व पालकांच्या व्हॉटस् अॅप ग्रुपवर प्रसिध्द् कराव्यात.

------------ *** -------------